# “भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेत महात्मा गांधींचे योगदान”

**डॉ. संजय गोरे** राज्यशास्त्र विभाग प्रमुख शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदुर, जि. चंद्रपुर 442908
मोबाईल क्र. ९२२६११६५४० Email id: sanjaygore.1462@rediffmail.com

---

**सारांश**

राष्ट्रीय एकात्मता लोकशाहीचा आत्मा मानला जातो. भारतीय संस्कृतीत विविधतेत एकता आहे. विविध जाती, धर्म, पंथ, भाषा व संस्कृती यामध्ये भारत देश विभागला आहे. राष्ट्रीय एकात्मतेसाठी सामाजिक, धार्मीक व शैक्षणिक समता महत्वाची आहे. सर्व गटांमध्ये राष्ट्राप्रती समानता असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे कोणत्याही सर्वकष सत्तावादापासून मुक्त असणारे ऐक्य होय. भारतात राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेची समस्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून तिव्र स्वरूपात होती मात्र भारतातील थोर पुरूषांनी सामाजिक एकता निर्माण करण्याचा सदैव प्रयत्न केलेले आहे. महात्मा गांधीचे भारताच्यया राष्ट्रीय एकात्मतेसाठी महत्वाचे योगदान आहे. हिंदू–मुस्लिम ऐक्य निर्माण करण्यात तसेच ग्रामसिध्दांत, श्रमप्रतिष्ठा, समाजव्यवस्था, विश्वस्त सिध्दांत, जातीयता व अस्पृष्यता निर्मुलन, धार्मीक ऐक्य, सत्य व अहिंसा, आर्थिक समानता, भाषीक ऐक्य, अल्पसंख्यांकांचा प्रश्न अश्या व इतर अनेक संकल्पना आपल्या प्रत्यक्ष कृतीतून महात्मा गांधींनी भारतीय जनतेत प्रत्यक्षात अमलात आणून भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेसाठी भरीव योगदान दिले आहे. अशा प्रकारे गांधीजींनी आपल्या विचारांच्या माध्यमातून राष्ट्रीय ऐक्य मजबूत करण्याचे कार्य केले आहे.

**प्रस्तावना**

भारताचा सामाजिक व धार्मीक इतिहास बघीतला तर असे दिसून येते की, भारतात विभिन्न जात, पंथ, धर्म, वंश, परंपरा, व संस्कृतीचे लोक राहतात. विविधतेत असलेल्या भारतीय समूहाला एकतेत आणून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे गरजेचे होते. राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली की, स्वातंत्र्याचा लढा निर्माण करणे सोपे जाईल हा विचार म. गांधींनी मांडला. त्या अनुषंगाने राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी विविध संकल्पना विचार भारतीय नागरीकांपर्यंत प्रसारीत करण्याचे कार्य म. गांधींनी केले आहे. स्वातंत्र्य पूर्व काळात भारतीय जनतेत राष्ट्रीय एकात्मतेची भावना खोलवर रूजलेली होती मात्र विविध गटात विखूरलेल्या भारतीय जन विचारांना राष्ट्रीय एकात्मतेच्या एका सुत्रात बांधण्याचे कार्य म. गांधी यांनी केले आहे. राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकत्र आलेल्या जनतेला दिडशे वर्ष सत्ता गाजविणाऱ्या ब्रिटीश सत्तेच्या विरोधात म. गांधी यांनी अनेक जाती, धर्म, पंथ, वंश परंपरा असलेल्या लोकांना राष्ट्रीय एकात्मतेच्या सुत्रात बांधून राष्ट्रीय आंदोलनाचे रूपांतर जनआंदोलनात केले. महात्मा गांधींनी विभिन्न जातीधर्मात विभागलेल्या लोकांना एकत्र आणून ब्रिटीश सत्तेच्या विरोधात विविध प्रकारच्या असहयोग आंदोलनातून अखंड भारताच्या निर्मीतीला सुरूवात केली व त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मतेचे बिजारोपण केले.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या व राष्ट्रीय एकात्मतेच्या म. गांधींच्या भुमिकेचे समर्थन करीत असताना श्री. के. एम. पण्णीकर लिहीतात की, “अखंड भारताच्या निर्मीतीत म. गांधींचे योगदान महत्वपूर्ण होते. म. गांधी असे एकमेव होते की ज्यांनी भारतीय राष्ट्रवाद जो केवळ बुध्दीजीवी वर्गापूरताच मर्यादित होता त्याला म. गांधीनी जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त करून दिले. एकात्मतेच्या दिशेने वाटचाल करीत असताना येणाऱ्या अडचणींची जाणीव गांधीजींना होती म्हणून लोकांना संघटीत करण्यासाठी म. गांधीनी अतिशय श्रम घेतले. सर्व धर्माच्या लोकांचे व जात, धर्म, परंपरा या विविधतेतून एकता निर्माण करून समानतेचे एकसंघ व अखंड राष्ट्र निर्माण करण्याचे म. गांधीचे स्वप्न होते.

**म. गांधींची राष्ट्रीय एकात्मतेसंबंधी भूमिका व योगदान :**

राष्ट्रीय एकात्मता ही प्रबळ शक्ती आहे. या शक्तीमूळे जनतेत आत्मविश्वास निर्माण होतो. म. गांधींनी आपल्या सत्य, प्रेम, शांती, अहिंसा आणि असहकार या तत्वांच्या आधारावर आपल्या भारत देशातील जनतेला राष्ट्रीय एकात्मतेचे धडे देवून अनेक चळवळी उभ्या केल्या. आपल्या विविध संकल्पनेच्या व विचारांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता भारतीय जनतेच्या मनात रूजविली. म. गांधींनी भारतातील जनतेत एकात्मता निर्माण करण्यासाठी हिंदू–मुस्लीम समाजात राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीसाठी अथक परिश्रम केले. मुस्लीम समाजाचे मन व विचार समजून घेण्यासाठी त्यांनी कुराणाचा व शरियत कायद्याचा सखोल अभ्यास केला. निरनिराळया धर्मातील लोक सहिष्णूता बाळगतील तर विविध धर्मात एकोपा निर्माण होईल असा त्यांना विश्वास होता. मुस्लीम बांधवांच्या असलेल्या भावना समजावून घेवून त्यांच्या प्रती सहानूभूती दाखविल्यास स्वातंत्र्य लढ्यात मुस्लीम समाजाचे योगदान घेता येईल अशा विचाराने महात्मा गांधींनी मुस्लीम–हिंदू मध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

उत्पादक साधनांच्या केंद्रीकरणाने आर्थिक विषमता निर्माण होते म्हणून त्यांनी ग्रामसमृध्दीच्या माध्यमातून विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला. गावातील ग्रामस्थ स्वयंनिर्भर व स्वयंपूर्ण राहण्यासाठी प्रत्येक गावात पंचायत व अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच शक्य आहे. गांधीजी राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणाचे समर्थक होते. गांधींजींचा आदर्श समाज पिरॅमिड सारखा नव्हे तर गोलाकार राहील. व्यक्ती

केंद्र बिंदू राहील. गावातील कायदेविषयक, न्यायविषयक आणि शासनविषयक सत्ता ग्रामपंचायतकडे राहील. मांधींनी उद्योगधंदयाचे विकेंद्रीकरण आवश्यक वाटत होते.

म. गांधींनी विश्वस्त सिध्दांताच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेची पायाभरणी केली. जमीनदार व भांडवलदार यांनी ट्रस्टी म्हणून समाजाच्या भलाईचे काम करावे. प्रत्येक व्यक्तीजवळ आपल्या गरजांची पूर्ती होईल इतकीच संपत्ती असावी म्हणजे संपत्तीच्या संबंधात गांधीजींनी सीमा सिध्दांत मान्य होता. प्रत्येकाला किमान मुलभूत सुविधा प्राप्त व्हावी असे म. गांधींना वाटत होते. राष्ट्रीय एकात्मतेसाठी म. गांधींनी श्रमप्रतिष्ठा महत्वाची मानली. आदर्श समाजाच्या उभारणीसाठी शारीरीक श्रमाला त्यांनी महत्व दिले. समाजात एकोपा निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने श्रम करावे प्रत्येक व्यक्तीने स्वत:चे अन्न मिळण्यापूरते श्रम करावे. प्रत्येक जाती व पंथाच्या लोकांनी श्रमाची प्रतिष्ठा जोपासून आत्मनिर्भर झाले पाहिजे यातून श्रमप्रतिष्ठा व राष्ट्रभक्ती निर्माण होईल व यातून राष्ट्रीय एकात्मता बळकट होईल असा विश्वास म. गांधीना होता.

म. गांधीच्या आदर्श राज्यातील प्रत्येक व्यक्ती सारखी श्रेष्ठ राहील. प्रत्येकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहीजे असे म. गांधींना वाटत होते. गरीब–श्रीमंत या सर्वांना म. गांधी समान दर्जा देतात. प्रत्यक जण माणूस म्हणून जगला पाहिजे असा सामाजिक समतेचा विचार म. गांधीचा होता. राष्ट्रीय एकात्मतेच्या बळकटीसाठी म. गांधींनी श्रम घेतले.

**समारोप:**

म. गांधींचे स्वातंत्र्य प्राप्तीसाठी तसेच राष्ट्रीय एकात्मतेसाठी अनन्यसाधारण योगदान आहे. भारतीय समाजातील जात, पंथ, वंश, परंपरा, भाषा, धर्म यांना एका सुत्रात बांधून राष्ट्रीय एकात्मतेसाठी विविध संकल्पना व विचार भारतीय समाजात रूजविला आहे. म. गांधींनी भारताला सत्य, अहिंसेच्या तत्वाच्या आधारे स्वातंत्र्य मिळवून दिले. म. गांधींनी धार्मिक ऐक्य, अल्पसंख्यांकाचा प्रश्न या सर्व घटकांच्या माध्यमातून भारतीय समाजात राष्ट्रीय एकात्मता रूजविण्याचे कार्य केले आहे.

**➢संदर्भग्रंथ**

१. डॉ. भा. ल. भोळे आधूनिक भारतातील पिपळापूरे अॅड राजकीय विचार पब्लिशर्स, नागपूर
२. यदुनाथ थत्ते गांधीजींची धर्मनिति महाराष्ट्र ग्रंथ भांडार मुंबई
३. जातीय ऐक्य गांधी विचार दर्शन वाड.मय प्रकाशन समिती वर्धा
४. डॉ. मृत्युंजय सिंह राष्ट्रीय एकात्मता आणि जी. सी. पब्लिशर्स महात्मा गांधी नागपूर प्र.आ. २०१४
५. बाळासाहेब भारदे सर्वधर्म समभाव आणि पृथ्वीराज प्रकाशन सामाजिक समता वारजे, पुणे
६. मो. क. गांधी सत्याचे प्रयोग रिया पब्लिकेशन अनुवादक सी.पु.पटवर्धन कोल्हापूर
७. कि. ध. मशरूवाला गांधी विचार दोहन नवजीवन प्रकाशन नवी दिल्ली १९९६
८. डॉ. अरविंद श्रृंगारपुरे समग्र भारतीय व विद्या प्रकाशन पाश्चात्य विचारवंत नागपूर २००६